# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालयः- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत म...

## सार्वजनिक आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./१३२९/२०२५-२६ दिनांक :१८/०९/२०२५.

प्रति,
सिस्टम मॅनेजर
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर पात्र/अपात्र यादी आक्षेप/हरकती मागविणेकामी मुदतवाढ देणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP), 15 वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत ठोक मानधनावरील विविध संवर्गातील रिक्त पदांची पदभरती करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. 11/07/2025 (E-1666836) रोजीच्या मान्यतेन्वये दि.28/07/2025 रोजी पदभरती जाहीर सूचना मिरा भाईंदर महानगरपालिका संकेतस्थळावर व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांच्या छाननी अंती पात्र व अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आक्षेप/हरकती मागविण्याकरीता महानरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी याकामी मुदतवाढ देण्यात आलेली असून सोबत जोडण्यात आलेली जाहीर सूचना प्रसिध्द करावी.

(डॉ.प्रमोद पडवळ)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

कार्यालय:- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, तळ मजला, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८९३०२८
ई-मेल:moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./१३३१/२०२५-२६** **दिनांक :१८ / ०९ /२०२५.**

### //जाहीर सूचना//

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP), 15 वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत ठोक मानधनावरील विविध संवर्गातील रिक्त पदांची पदभरती करणेकामी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जा.क्र. मनपा/सार्व. आ.वि./८८१/२०२५-२६ दि. २८/०७/२०२५ रोजी जाहीर सूचना प्रसिध्द करून ऑफलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. त्यान्वये प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने कागदपत्रे तपासणी, छाननीअंती व जाहीर सूचनमधील शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या निकषानुसार जा.क्र. मनपा/सार्व. आ.वि./१२६८/२०२५-२६ दि. १२/०९/२०२५ अन्वये पदनिहाय नमूद उमेदवारांची पात्र व अपात्र यादी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

उपरोक्तनुसार प्रसिध्द केलेल्या पात्र/अपात्र यादीतील उमेदवारांना काही हरकती असल्यास दि. १८/०९/२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत आक्षेप/हरकती सादर करणेकामी मुदत देण्यात आलेली होती.

या जाहीर सूचनेद्वारे उमेदवारांना सूचित करण्यात येते की, सदरची मुदत दि. २३/०९/२०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तरी संबधितांनी विहित मुदतीत आपले आक्षेप/हरकती सादर कराव्यात. (अपात्र उमेदवारांकडून सादर करण्यात येणाऱ्या कागदपत्रावरील तारीख ही जाहिरातीतील नमूद पदांसाठी अर्ज करावयाच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणेजच दि.२०/०८/२०२५ असली तरच ग्राहय धरण्यात येईल).

तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM), 15 वा वित्त आयोग (नागरी आयुष्यामन आरोग्य मंदिर) व हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या अभियान/कार्यक्रमा अंतर्गत वैद्यकीय अधिकारी या पदाकरीता अर्ज सादर करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करणेकामी दि. २४/०९/२०२५ रोजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर वेळापत्र प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार पात्र उमेदवारांनी विहित वेळेत अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या सर्व मुळ प्रतींसह उपस्थित रहावे.

आक्षेप / हरकती सादर करणेकरीता उमेदवारांनी खालील तक्त्यात (नमून्यात) आपली माहिती सार्वजनिक आरोग्य विभाग, तळमजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडलीतलाव, भाईंदर (प.) येथे सादर करणे आवश्यक राहील.

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवारांचे नाव : | |
| २. | यादीतील अर्ज क्रमांक | |
| ३. | पदनाम : | |
| ४. | हरकत : | |
| ५. | हरकतीच्या अनुषंगाने सादर करण्यात येणारी आवश्यक कागदपत्रे : | १.<br>२.<br>३.<br>४.<br>५. |
| | | उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी |

**(डॉ.प्रमोद पडवळ)**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**